# मेहतर समाजाचा आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास

**विजय दे.रजाणे**
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र,
अंबाजोगाई, जि. बीड

**गोषवारा :**

मेहतर समाजाचा समावेश भारतीय राज्यघटनेतील अनुसूचित जाती प्रवर्गात असलेला आढळून येतो. भारतीय जात व्यवस्थेच्या परंपरेच्या आधारे पूर्वीपासून मेहतर समाज स्वच्छतेचे काम करताना दिसून येतो. या समाजातील व्यक्तींना पारंपरिक व्यवसायातून मिळणारे उत्पन्न कमी असल्याने तसेच मेहतर समाजातील अधिक लोकसंख्या शहरी भागात सद्य:स्थितीतही स्वच्छतेच्या कामात गुंतलेले दिसून येतात. शिक्षणाचे प्रमाण कमी, अज्ञान, पारंपरिक व्यवसायाचा कल, व्यसनाधिनता या कारणांमुळे मेहतर समाजामध्ये आर्थिक व सामाजिक प्रश्न निर्माण होतात. मेहतर समाज स्वच्छता करणाऱ्या कामात असल्याने इतर कामात या समाजाचा सहभाग अधिक प्रमाणात दिसून येत नाही. बदलत्या मानवी जीवनामुळे उदरनिर्वाह करताना आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण होत जातात.

**मुख्य स्त्रोत :** वार्षिक दरडोई उत्पन्न, उत्पन्नाची साधने, आर्थिक व सामाजिक समस्यांची कारणे.

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटनेने जातीप्रथा व अस्पृश्यता कायद्याद्वारे नष्ट केली असली तरी समाजात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जातीयता व अस्पृश्यता पाळली जाते. जातीयतेच्या आधारे मानवी श्रमाची विभागणी झाल्याने वर्णव्यवस्थेतून निर्माण झालेल्या शुद्र वर्णातील अस्पृश्य जातीच्या पारंपरिक व्यवसायाला स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही सहभाग असलेला दिसून येतो. यामध्ये मेहतर समाज हा देशातील उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, दिल्ली, हरियाणा, पंजाब, महाराष्ट्र, राजस्थान, छत्तीसगढ या राज्यांमध्ये अधिक संख्येने वास्तव्य करताना दिसतो. तसेच महाराष्ट्रातील शहरी भागात विशेषत: मुंबई, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, पुणे, अहमदनगर या ठिकाणी आढळतो. मेहतर

समाजाच्या कामाबद्दल समाजातील इतर लोकांकडून विशेषत: उच्चवर्णीयांकडून उदासीन असल्याचे दिसते. विशेषत: त्यांच्या परंपरागत कामाबद्दल या समाजाची अपेक्षाच केली जाते. त्यामुळे या समाजाच्या वाट्याला उपेक्षा, दारिद्र्य, व्यथा, वेदना उत्पन्न होतात. पारंपरिक स्वच्छतेच्या कामाला उच्च समाज व इतर समाज सहसा स्वीकारत नाही. यामुळे मेहतर समाजाच्या उदरनिर्वाह व व्यवसायाचे इतर मार्ग स्वीकारताना दिसत नाही. या समाजाच्या वाट्याला उपेक्षित आणि बहिष्कृत जीवन आले आहे. तंत्रज्ञानात झालेले बदल समाज परिवर्तनात झालेले बदल होत असले तरी मेहतर समाजाची आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा होण्याचे प्रमाण कमी आहे. पारंपरिक व्यवसायातून मिळणारे अल्प वेतन, शिक्षणाचे अल्प प्रमाण, स्वच्छतेच्या कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, वाल्मिकी मेहतर जातीबद्दल सवर्ण व इतर समाजाची मानसिकता. यामुळे ही मेहतर समाजाच्या समस्यांमध्ये वाढ होत असलेली आढळून येते. मेहतर समाजाच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने काही कार्यक्रम, उपाययोजना राबविल्या असल्या तरीही मेहतर समाजाचे सामाजिक व आर्थिक जीवनमान मागासलेले आहे. देशातील मैला स्वच्छता ही प्रथा फार प्राचीन काळापासून चालत आलेली असून भारतातील वेगवेगळ्या शहरात स्वच्छतेच्या कामात मेहतर समाजाच्या स्त्री व पुरुषांचा सहभाग राहिलेला आहे. असे असतांनाही मेहतर समाजातील आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास करून वाल्मिकी मेहतर समाजातील स्थितीचा मागोवा घेणे महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) मेहतर समाजातील आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.

२) मेहतर समाजातील आर्थिक व सामाजिक समस्यांचा आढावा घेणे.

३) मेहतर समाजातील सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

**गृहीतकृत्ये :**

१) मेहतर समाजातील आर्थिक खालावलेली आहे.

२) मेहतर समाजाच्या आर्थिक व सामाजिक सुधारणा करण्यासाठी शासनाने विविध कल्याणकारी योजना राबविल्यास त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकते.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने वर्णनात्मक संशोधन आराखड्याद्वारे मांडणी करण्यात केलेली आहे. यामध्ये मेहतर समाजातील आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास वर्णनात्मक पद्धतीने सविस्तरपणे वर्णन केले आहे.

**तथ्य संकलन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी संशोधकाने द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर केलेला असून यामध्ये विविध संदर्भीय पुस्तके, प्रत्यक्ष निरीक्षणे, वेब साईड, मासिक यांचा वापर करून तथ्यांचे संकलन करून अभ्यास विषयाची मांडणी केली आहे.

**मेहतर समाजाची आर्थिक स्थिती :**

वाल्मिकी मेहतर समाजाची आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी शासकीय स्तरावर काही प्रमाणात प्रयत्न केले असले तरी मेहतर समाजाला सद्य:स्थितीतही आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. मेहतर समाजाचा समावेश वर्ण व्यवस्थेत शुद्र या वर्णात होत असल्यामुळे स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही मेहतर समाजाची आर्थिक स्थितीत बदल झालेला नाही. देशामध्ये सामाजिक, आर्थिक सुधारणाचे प्रयत्न होत असले तरी मेहतर समाज आर्थिक संघटांचा सामना करताना दिसतो. देशातील अनेक राज्यामध्ये वाल्मिकी मेहतर समाजाला वेगवेगळ्या जातीच्या नावाने संबोधले जाते. यामध्ये वाल्मिकी भंगी, मेहीवाल, सुदर्शन, चूहडा, लाल बेगी इत्यादी. या सर्व जाती मैला स्वच्छतेच्या कामात सहभागी असल्याने सार्वजनिक स्वच्छता करणे, सार्वजनिक उत्सवात जत्रा या प्रसंगी मेहतर वाल्मिकी समाज काम करताना आढळतो. पारंपरिक कामातून मिळणारे वेतन अल्प असल्याने व इतर कामात सहभागी करून न घेतल्याने आर्थिक समस्या निर्माण होतात. मेहतर समाजातील व्यक्तींना श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही. त्यामुळे ते दारिद्र्याच्या दरीत ढकलले जातात. या समाजातील व्यक्ती सार्वजनिक स्वच्छता, नालेसफाई, मैला सफाई या स्वरूपाची कामे करावी लागत असतात. या कामातून मिळणारे वेतन अल्प असते. तसेच मिळणाऱ्या वेतनातून अनेक व्यक्ती व्यसन करतात. म्हणून आर्थिक समस्या निर्माण होतात. आर्थिक स्थिती मध्यम स्वरूपाची असल्याने मुलांच्या शिक्षणावर अधिक पैसा खर्च केला

जात नाही. मेहतर समाजाची आर्थिक स्थिती गरीबीची असल्यामुळे भौतिक साधनांचा अभाव दिसून येतो. वर्ण व्यवस्थेमध्ये चौथ्या वर्णात म्हणजेच अस्पृश्य वर्गात मेहतर वाल्मिकी समाजाचा समावेश होत असल्याने त्यांच्या वाट्याला खालची कामे स्वच्छतेची कामे वाट्याला आलेली आहेत. धर्मव्यवस्थेचा प्रभाव मेहतर समाजावर होत असल्याने आर्थिक उत्पन्नची साधने मर्यादित आहे. यामुळे आर्थिक स्थिती खालावल्याने सामाजिक स्तर निम्न असल्याचे आढळून येतो. भारतातील उत्तर भारतात असलेल्या राज्यामध्ये सद्य:स्थितीतही मेहतर समाजाची आर्थिक स्थिती निम्न स्वरूपाची असल्याचे मत मेहतर समाजाच्या जीवनावर अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांनी मांडलेले आहे.

महाराष्ट्र राज्यातील मेहतर समाजाचा सुक्ष्म पद्धतीने अभ्यास केला असता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, अमदनगर यासारख्या शहरामध्ये मेहतर समाजातील व्यक्ती विविध ठिकाणी स्वच्छतेच्या कामात उदरनिर्वाह करतात. ज्या व्यक्ती महानगरपालिका, नगरपालिका, सरकारी कार्यालय, नगर परिषद या ठिकाणी सफाई कर्मचारी म्हणून काम करतात. त्यांना मिळणारे वेतन मध्यम प्रकारचे असते. पंरतु यातील पुरुष सफाई कर्मचारी व्यसन करतात. तर विविध सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात काम करणाऱ्या मेहतर समाजातील व्यक्तींची संख्या अकि असल्याने त्या कामातून अल्प वेतन मिळते. त्यामुळे त्या वेतनातून कौटुंबिक गरजापूर्ण केल्या जात नाही. परिणामी आर्थिक समस्यांना सामना या समाजातील व्यक्तींना करावा लागतो. काही ठिकाणी वेठबिगारी स्वरूपाची कामे मेहतर समाजातील व्यक्ती करताना दिसतात.

**मेहतर समाजाची सामाजिक स्थिती :**

मेहतर समाजाची सामाजिक स्थिती सद्य:स्थितीतही बिकट असल्याचे अभ्यासातून आढळून येते. परंपरेने जातीव्यवस्थेनुसार मेहतर समाजाच्या वाट्याला हलक्या स्वरूपाची, स्वच्छतेची कामे आलेली असल्याने या समाजाकडे उच्चवर्णीय जातीचा पाहण्याचा दृष्टिकोन दुय्यम प्रतीचा आहे. तसेच उच्चवर्णीयाप्रमाणे इतर मागास जातीही मेहतर समाजाकडे भेदभावपूर्ण भावनेतून पाहिले जाते. समाजातील विविध क्षेत्रामध्ये सद्य:स्थितीतही जातीयता, अस्पृश्य प्रथेला या समाजातील व्यक्तीना सामोरे जावे लागते. सामाजिकदृष्ट्या समाजाच्या मुख्य प्रवाहात मेहतर समाजाला सहभागी

करून घेतले जात नाही. अनेक पिढ्या स्वच्छतेच्या कामात अडकलेल्या वाल्मिकी, मेहतर, सुदर्शनडोम-डुमार इत्यादी जातीच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत सुधारणा झालेली दिसून येत नाही.

सामाजिकदृष्ट्या मेहतर समाज वंचित आहे. त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव निर्माण न झाल्याने अन्याय, अत्याचाराचा सामना करावा लागतो. केंद्र व राज्य सरकारने नेमलेल्या अनेक समित्या, आयोगाच्या शिफारशी आणि त्यांच्यासाठी असलेल्या सरकारी योजनांबाबत माहितीचा अभाव असल्याने ८१ टक्के लोक सामाजिक, आर्थिक समस्याचा सामना करताना दिसतात. देशात खाजगीकरणाचे धोरण सरकारने अवलंबिले असल्याने मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद यासारखी शहरे स्मार्ट होत असली तरी स्वच्छतेच्या कामात ठेकेदारी पद्धत / कंत्राटीकरण वाढल्याने नोकरीमध्ये असुरक्षित व असंघटितांच्या संख्येत प्रचंड वाढ झालेली दिसते. मैला सफाईचे अमानवीय काम हे जातीय परंपरेने लादले गेले असल्याने उच्च जातीच्या सामाजिक, द्वेषाचा सामना पावलोपावली मेहतर समाजाला करावा लागतो. खालच्या जातीचे असल्याने तसचे मानवी मैला, गटारी स्वच्छता, नाले सफाई या कामात मेहतर समाज असल्याने सामाजिक व्यवहार इतर उच्च वर्णीय समाज, मेहतर समाजाशी कमी करताना दिसतो. जातीव्यवस्थेनुसार मेहतर समाज शुद्र वर्णात मोडत असल्याने भारतीय समाजात प्राचीन कालखंडापासून मेहतर समाजाला मानवी विकासापासून दुर्लक्षित असल्याचे दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मेहतर समाजाचा समावेश अनुसूचित जाती प्रवर्गात होतो. परंतु अज्ञान, शैक्षणिक प्रगतीचा अभाव, यामुळे मेहतर समाजाचा सामाजिक विकास होऊ शकलेला नाही. कल्याणकारी कार्यक्रमाची निर्मिती करूनही मेहतर समाजाचे सामाजिक मागासलेपण कमी झालेले नाही. मेहतर समाजाच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडून आणण्यासाठी अधिक कटाक्षपणे प्रत्यन शासनाला करावे लागतील.

**सारांश :**

भारतीय राज्यघटना अस्पृश्यता प्रथेला कलम १७ प्रमाणे प्रतिबंध करते व कलम १४ प्रमाणे समानता बहाल करते व प्रत्येकाला आपल्या गुणवत्तेनुसार विकास व प्रगती करण्यासाठी

संधी प्रदान करते. इतके असूनही पारंपरिक व्यवसायाला न दिलेला फाटा, रुढी, प्रथा, परंपरेचा असलेला पगडा, व्यसनाधिनता यामुळे मेहतर समाजाच्या स्थितीत सुधारणा झालेली नाही. तसेच आत्मसम्मान, दर्जा व प्रतिष्ठा याचे महत्त्व मेहतर समाजातील व्यक्तीमध्ये नसल्याने जातीव्यवस्थेच्या चौकटीत मेहतर समाज जीवन जगत आहे. यातून बाहेर येण्यासाठी मेहतर समाजामध्ये संघटीत होणे व शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेणे गरजेचे आहे. तरच या समाजातील आर्थिक व सामाजिक मागासलेपणा दूर होऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी पाऊले उचलणे गरजेचे आहे. यासाठी समाजात शासनाने व मेहतर समाजातील व्यक्तींनी संविधानिक आरक्षण, धोरण यांचा लाभ घेतलेला असलेल्या व्यक्तीने आपल्या समाज बांधवाच्या न्यायासाठी व कल्याणासाठी पुढे येऊन काम करणे गरजेचे आहे आणि शासनानेही प्रयत्न करणे तितकेच गरजेचे आहे असे वाटते.

**निष्कर्ष :**

१) मेहतर समाजाची आर्थिक स्थिती बिकट आल्याने त्यांना आर्थिक समस्या निर्माण होतात.

२) पारंपरिक व्यवसायातून मिळणारे वेतन हे आधुनिककीकरणात कौटुंबिक गरजा पूर्ण करू शकत नाही.

३) खाजगीकरणाच्या धोरणाचा परिणाम सरकारी नोकरीत कंत्राटी पद्धत सुरु झाल्याने कमी वेतनावर स्वच्छतेचे पारंपरिक कामे करावी लागतात. त्यामुळे गरीबीच्या संख्येत वाढ होते.

४) आर्थिक स्थितीत सुधारण्यासाठी कल्याणकारी कार्यक्रम, योजना, धोरण राबूनही मेहतर समाजाच्या आर्थिक स्तर यात सुधारणा झालली दिसून येत नाही.

५) जातीव्यवस्थेत मेहतर समाजाचे स्थान कनिष्ठ जातीत असल्याने सामाजिक, अन्याय अत्याचारांना मेहतर समाजातील व्यक्तींना बळी पडावे लागते.

६) मेहतर समाजाच्या सामाजिक मागासलेपणाला, अज्ञान, शिक्षणाचा अभाव, पारंपरिक व्यवसाय जबाबदार असल्याचे आढळून येते.

७) सामाजिक समायोजन होण्यासाठी मेहतर समाजातील व्यक्तींनी शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करून इतर व्यवसायात सहभागी झाले पाहिजे.

**उपाययोजना :**

१) जगदिश खैरालिया अहवालाची शासनाने मेहतर समाजाच्या आर्थिक विकासासाठी अंमलबजावणी करण्यात यावी.

२) मेहतर समाजाचे आर्थिक स्तर उंचावण्यासाठी व्यवसाय, उद्योगधंदे सुरु करण्यासाठी बँक, पतसंस्था, यामार्फत कर्जपुरवठा उपलब्ध करून द्यावा.

३) मेहतर समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी असलेल्या योजनांची जनजागृती व अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने पुढाकार घेऊन कार्य करावे.

४) मेहतर समाजाचे सामाजिकीकरण होण्यासाठी व मेहतर समाजावर होणाऱ्या अत्याचाराला थांबविण्यासाठी सामाजिक कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

५) स्वच्छतेच्या कामात मेहतर समाजाच्या व्यक्तीचे संरक्षण होण्यासाठी सुरक्षित साधनांची उपलब्धता करून द्यावी.

**संदर्भ ग्रंथ :**

१) रामशरण शर्मा - शूद्रों का प्राचीन इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, १९९२

२) भगवानदास - वाल्मीकी जयंती और भंगी जाती, दलित वर्ल्ड लायब्ररी, नई दिल्ली, १९७३

३) अरुण ठाकूर और महम्मद खडस - नरकसफाई, राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली, १९९६

४) संजीव खुदशाह - सफाई कामगार समुदाय, राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली, २००५

५) एम. आर. विद्रोही - दलित दस्तावेज, दलित साहित्य प्रकाशन, नई दिल्ली, १९८९